**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.5 No. 18** **May-June 2024**

# पंचगव्हाण येथील मुगलकालीन शिलालेखांचा अभ्यास

**डॉ श्याम प्रकाश देवकर**
पत्ता - गोपाळ नगर, हनुमान मंदिरजवळ,
खामगाव, जि. बुलडाणा. पिन 444303
**Email:** shyam.deokar11983@gmail.com
**Corresponding Author - डॉ श्याम प्रकाश देवकर**
**DOI- 10.5281/zenodo.11655449**

**गोषवारा:**

१५९६ ला चांदबिबीने वऱ्हाड प्रांत मोगलांना कायमस्वरूपी दिल्याने या प्रांतावरील अहमदनगरच्या निजामशाहीचा अंमल संपुष्टात आला व महाराष्ट्रातच नव्हे तर दक्षिणेतील मोगलांचे पहिले आगमन हे वऱ्हाडातच झाले. मोगलांनी आपले पहिले लष्करी ठाणे बाळापुरला व नंतर शहापूरला वसवले. शहापूर हे शहर वसवल्याचे व तेथे सुंदर राजमहाल बांधण्याचे श्रेय अकबरपुत्र मुरादला जाते. हे शहापूर आरंभीच्या काळात वऱ्हाडची मुगलांची राजधानी होती.[1] मोगलांचा या प्रांतावरील वर्चस्वाचा कालखंड १५९६ ते साखरखेर्ड्याची लढाई १७२४ पर्यंत सांगता येईल. या कालखंडात अनेक महत्वाची लष्करी व्यापारी ठाणी उदयास आली. त्यापैकीच एक पंचगव्हाण (ता.तेल्हारा जि अकोला) हे एक महत्वाचे परगणा मुख्यालयाचे गाव होते. या गावची ओळख नेकनाम घराण्यामुळे निर्माण झाली. मुगल काळात त्यांच्या आगमनापासूनच हे घराणे मुगलांशी एकनिष्ठ होते व शेवटपर्यंत त्यांच्या लष्करी सेवेत ते राहिले. त्यांच्या घराण्याच्या अनेक सरदारांनी पिढी दर पिढी मुगल सैन्यात सेवा देवून वीरमरण पत्करलेले दिसून येते.


पंचगव्हाण या अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यात असणाऱ्या गावामध्ये एकूण आठ शिलालेख असून सात शिलालेख हे या गावातील नेकनाम घराण्याशी निगडीत आहेत, ज्यांनी आपले जीवन जहांगीर व शहाजहानचे सेवेत अर्पण केले आहे. आठवा शिलालेख जहांदरशहाचे काळातील आहे. पंचगव्हाण हे गाव पाच गावांचा समूह होता. हे गाव हैद्राबादच्या निजामाच्या काळातही परगणा मुख्यालय होते. आधी प्रत्येक गावाला वेगळा अधिकारी असणाऱ्या ३६ गावांचा समूह पंचगव्हाणच्या अखत्यारीत येत असे. मुगल काळात जहांगीर व शहाजहानचे काळात एवढी सेवा बजावणारे गाव असूनही ते इतिहासामध्ये फारसे प्रकाशझोतात आहे नाही. पंचगव्हाणमधील गावाच्या दक्षिणेस असणाऱ्या नेकनाम साहेब दर्ग्याच्या चार भिंतीच्या आत व बाहेर या घराण्याची अनेक थडगी आहेत. या थडग्यांच्या शिरोशिळेवर हे शिलालेख उत्कीर्ण केलेले आहेत. आठवा शिलालेख दर्ग्याच्या पश्चिम बाजूस असणाऱ्या मशीदीवर आहे. पंचगव्हाण हे गाव कदाचित तत्कालीन जहागिरीचे मुख्यालय असावे.

सात पैकी पाच शिलालेख एकाच कुटुंबातील म्हणजेच मीर मोहम्मद युसुफ नेकनाम यांच्या कुटुंबातील आहेत. यातील दोघांचे मृत्यू धारूर जि. बीड व मुल्हेर जि. नाशिक येथे लढाई दरम्यान झाल्याची नोंद आढळते. मृत्यू स्वतःच्या गावाच्या इतक्या दूर झाला असूनही ज्या अर्थी त्यांचे थडगे या गावात आहेत त्याअर्थी त्यांचे मृतदेह येथे आणून पुरले असावे. यावरून या घराण्याला आपल्या गावाची किती ओढ व आस्था होती हे दिसून येते. बुलक बेगच्या थडग्यावरील शिलालेख वगळता इतर शिलालेखांचा दर्जा व अक्षरांकन पद्धत अत्यंत उच्च दर्जाची आहे. हे साठी शिलालेख एकाच व्यक्तीने व तीही अत्यंत कुशल उत्कीर्णकाने उत्कीर्ण केले असावे. डोळयाचे पारणे फिटणारे अत्यंत उच्च दर्जाचे हे शिलालेख आहेत. मीर मोहम्मद हुसेन नेकनाम व त्यांच्या तीन मुलांच्या कबरी मीर शहा हुसेन, मीर फरीदुन हुसेन व मीर शरफुद्दीन हुसेन ज्यांना हिंमत खान म्हणूनही ओळखले जाते या तिघांच्यासह

वडिलांची कबर एकाच ओट्यावर आहेत. मीर मोहम्मद हुसेन या चौथ्या मुलाची व इतर एक कबर दुसर्या एका स्वतंत्र ओट्यावर आहे. पुन्हा एक ओळख न पटलेली कबर एका वेगळया ओट्यावर आग्नेय बाजूस आहे. तर बुलक बेगची कबर ही दक्षिण दिशेला आहे.[2]

या मुगल कालखंडात अकोला जिल्ह्यातील आजच्या तेल्हारा तालुक्यातील पंचगव्हाण या गावात असणाऱ्या मुगल कालीन शिलालेखांचा अभ्यास आपण येथे करणार आहोत.

**१. पंचगव्हाण येथील मीर मोहम्मद युसुफ नेकनाम यांच्या थडग्यावरील शिलालेख –**



वर दाखविलेला शिलालेख पंचगव्हाण येथील युसुफ नेकनाम यांचा पुत्र मीर मोहम्मद हुसेन नेकनाम यांच्या थडग्यावरील असून त्यांचे दफन हिजरी सन १०१९ म्हणजेच इ.स. १६१० ला केल्याचे सदर शिलालेखा मध्ये नमूद आहे. या शिलालेखाची लांबी १.२२ मी व रुंदी ४६ सेमी आहे. शिलालेखामध्ये एकूण नऊ ओळी असून त्या पर्शियन भाषेमध्ये गद्य व पद्य स्वरुपात आहेत. शिलालेखाच्या सुरुवातीच्या दोन ओळी प्रसिद्ध इराणीयन कवी सादी यांच्या आहेत व उरलेल्या सात ओळी ह्या कबरीविषयी माहिती पुरवतात कि, ही कबर मीर मोहम्मद युसुफ नेकनाम अल्वी यांची असून त्यांचा मृत्यू हिजरी सणाच्या १०१९ च्या १९ व्या सफरमध्ये म्हणजेच ३ मे १६१० ला जहांगीरच्या कार्यकाळामध्ये दख्खनच्या सैन्याशी लढताना झाला होता. (हिरालाल यांनी राज्यारोहणाच्या चुकीच्या मोजमापामुळे त्यांच्या मृत्यूचे वर्ष हिजरी १०२५ असे चुकीचे ठरवले आहे ती कालगणनेतील चूक असावी.) दख्खनच्या सैन्याने मुगलांचा रस्ता अडवून ठेवलेला होता. या लाधैमध्ये मीर मोहम्मद हुसेन नेकनाम यांचा मोठा मुलगा, नातेवाईक व नोकरचाकर सुध्दा मारल्या गेले होते. ही लढाई मलिक अंबरच्या सैन्याशी मुगल सैन्याची झाली होती. मात्र ती कोठे झाली याबाबत फारशी माहिती उपलब्ध नाही, मात्र याच युद्धात मीर मोहम्मद हुसेन नेकनाम मारल्या गेले व ती लढाई वऱ्हाडमध्येच कोठे तरी झाली असावी.

मलिक अंबरच्या सैन्यामध्ये मोठ्या प्रमाणावर मराठा सैनिकांचा भरणा होता व हे मराठा सैनिक छापामार युद्धतंत्रामध्ये पारंगत होते, शिवाय त्यांना स्थानिक भौगोलिक परिस्थितीचे पुरेपूर ज्ञान होते त्यामुळे युद्धात त्यांचेसमोर टिकणे अवघडच होते. अशाच एका गनिमी कावा युध्दतंत्र अवलंबणाऱ्या मलिक अंबरच्या स सैनिकी तुकडीची गाठ मीर मोहम्मद हुसेन नेकनाम यांच्या सैन्याशी झाली असावी व त्यातच ते त्यांच्या मुलगा, नातेवाईक, नोकरचाकर व सैन्यासह मारल्या गेले असावेत. मात्र मीर मोहम्मद हुसेन व मीर शरफुद्दीन हुसेन ज्यांना हिंमत खान म्हणून ओळखतात. या बाप लेकाची नावे वगळता मारल्या गेलेल्यांची नावे उपलब्ध नाहीत. मीर युसुफ नेकनाम यांची कबर आता संताचा दर्गा म्हणून प्रसिद्ध आहे व मीर युसुफ नेकनाम यांचेविषयी आज परिसरामध्ये संत म्हणून मोठा आदर आहे.[3]

 ISSN – 2347-7075

**२. पंचगव्हाण येथील मीर शहा हुसेन यांच्या थडग्यावरील शिलालेख -**



सदर शिलालेखामध्ये मीर शह हुसेन जे युसुफ नेकनाम याचे पुत्र होते ते त्यांच्या वडिलांसोबतच हिजरी सन १०१९ ला म्हणजेच इ.स. १६१० ला मारल्या गेले होते. हा कालखंड जहांगीरचे कार्यकाळातील आहे. मीर मोहम्मद हुसेन नेकनाम व त्यांच्या तीन मुलांच्या कबरी मीर शहा हुसेन, मीर फारीदुन हुसेन व मीर शरफुद्दीन हुसेन ज्यांना हिंमत खान म्हणूनही ओळखले जाते. या तिघांच्यासह वडिलांची कबर एकाच ओट्यावर आहे.


त्यापैकी ही कबर सर्वात पूर्वेकडे आहे. मीर शहा हुसेन हे आपल्या पित्यासह म्हणजेच मीर युसुफ हुसेन यांच्यासोबत सन १६१० मध्ये एका युध्दात मारल्या गेले.या शिलालेखामध्ये मीर शहा हुसेन यांचे हौतात्म्य त्यांचे वडिलांचे सोबत आल्याचे स्पष्टपणे नमूद आहे. शिलालेखाची लांबी म्हणजेच या ठिकाणी उंची ९६ सेमी तर रुंदी ४६ सेमी आहे. शिलालेखाची सुरुवात अल्लाह अमर्त्य आहे या शब्दाने होते. हा शिलालेख पर्शियन भाषेत आहे आणि तो गद्य व पद्य स्वरुपात आहे. या शिलालेखामध्ये एकूण सात ओळी आहेत. हिरालाल यांनी या लेखाचे संपादन करताना हिजरी सणाच्या १०२५ वर्षाचा काढलेला निष्कर्ष चुकीचा असल्याचे दिसून येते.[4]

**3.पंचगव्हाणचा हिंमत खान याने बांधलेल्या मशिदीवरील शिलालेख -**



या शिलालेखाची लांबी ६० सेमी व रुंदी ४६ सेमी असून यामध्ये दोन ओळी पर्शियन भाषेतील श्लोक आहे. दगडाच्या या मशिदीच्या उजव्या मिनारीच्या पायाजवळ हा शिलालेख दिसून येतो. ही मशीद नेकनाम साहिब दर्ग्याच्या पश्चिमेस लागुनच आहे. ही मशीद हिंमत खानाने १६३७ मध्ये शहाजहानचे काळात बांधली असल्याचा उल्लेख या शिलालेखामध्ये आहे. मशिदीचे बांधकाम २९ जून १६३७ च्या पूर्वी झाले असावे कारण या तारखेला हीमत खानच मृत्य किल्ले धारूर येथे झाला होता.[5]


**४. पंचगव्हाण येथील मीर फरीदुन हुसेन यांच्या कबरीवरील शिलालेख –**



मीर मोहम्मद हुसेन नेकनाम व त्यांच्या तीन मुलांच्या कबरी मीर शहा हुसेन, मीर फरीदुन हुसेन व मीर शरफुद्दीन हुसेन ज्यांना हिंमत खान म्हणूनही ओळखले जाते या तिघांच्यासह वडिलांची कबर एकाच ओट्यावर आहेत असे आपण वर नमूद केलेले आहे. त्यापैकी मीर फरीदुन हुसेन यांचे कबरीवरील हा शिलालेख असून तो कबरीच्या शिरोशीळेवर अंकित केलेला आहे.मीर मोहम्मद हुसेन व मीर शहा हुसेन यांचा मृत्य एकाच युद्धात झाला. मात्र मीर फरीदुन यांचा मृत्य खिर्की येथील लढाईमध्ये दख्खनी फौजांनी अर्थात मराठ्यांनी घातलेल्या छापामार युद्धात हिजरी सन २५ मोहर्रम १०२५ म्हणजेच ३ फेब्रुवारी १६१६ ला झाला होता. शिलालेखातील ओळीवरून तो कुराणचा सच्चा पाईक होता. या लेखाबाबत सुधा हिरालाल यांनी मांडलेले मत कि त्याच्या वडिलांच्या अंताच्या एक महिन्याच्या पूर्वी त्याचा अंत झाला होता सत्यस्थितीला धरून नाही व येथे सुधा कालनिश्चिती करताना त्यांचा गोंधळ उडाल्याचे दिसून येते. मोगल व मलिक अंबर यांच्यामध्ये झालेल्या अनेक लढायापैकी खिर्कीची एक लढाई असून १६२१ ला शहाजहानने खिर्कीचा संपूर्ण विनाश घडवून आणला होता त्या लढाईपूर्वीची खिर्की येथीलच सन १६१६ ची ही लढाई होती ज्यात मीर फरीदुन हुसेन मारल्या गेले होते. जहांगीर बादशाहने या काळातील घडामोडींची माहिती नोंदवताना लिहिले आहे की, २६ बहामन (हिजरी सनाच्या सूर्य पंचांगातील अकरावा महिना) ला व राज्यारोहणाच्या दहाव्या वर्षी शाही फौजेने अंबर जिंकून खिर्की काही दिवसांसाठी ताब्यात घेतली व ***रोहीणखेडला*** परत जाताना तेथील इमारती नष्ट केल्या. मात्र जहांगीरला खिर्की वरील ताबा सोडून रोहीणखेडला परत मागे का यावे लागले याचे समाधानकारक स्पष्टीकरण मात्र केलेले दिसत नाही.[6]

खिर्कीच्या ज्या युद्धात मीर फरीदुन हुसेन मारल्या गेला होता ती लढाई २५ मोहर्रम १०२५ म्हणजेच 3 फेब्रुवारी १६१६ ला घडून आली होती. मुगल सैन्य त्यांच्या जवळच्या रोहीणखेड या तळावरून खिर्कीवर हल्ला करण्यासाठी २६ बहामन (राज्यारोहणाच्या दहाव्या वर्षी) म्हणजेच २० मोहर्रमला निघाले होते व दोन दिवसात खिर्की येथे खिर्कीवर ताबा मिळवण्यासाठी पोहोचले होते. उपरोक्त शिलालेखानुसार ही लढाई २५ मोहर्रमला *¼1st Isfandarmuz½* झाली होती. या तारखेला किंवा या तारखेच्या आधी मलिक अंबरच्या फौजेने मुगल सैन्यावर गनिमी काव्याने हल्ला करून त्यांना रोहीणखेड पर्यंत मागे हटण्यास बाध्य केले होते अन्यथा जिंकणारी मुगल सेना अचानक अशी मागे हटली नसती. या अपमानजनक घटनेचा उल्लेख टाळणेच जहांगीरने पसंत केले असावे. त्यामुळे त्याने या युद्धातील मागे हटण्याच्या कारणाचा उल्लेख टाळला असावा.मात्र या सैन्यामध्ये मीर फरीदुन कोणत्या पदावर होते याचा कोणताही उल्लेख आढळत नाही मात्र कदाचित ते एका महत्वाच्या सन्मानजनक पदावर असावेत असे दिसून येते.


### ५. पंचगव्हाण येथील मीर शरीफुद्दीन हुसेन यांच्या कबरीवरील शिलालेख –



मीर मोहम्मद युसुफ नेकनाम यांचा पुत्र मीर शरफुद्दीन हुसेन ज्यांना हिंमत खान म्हणून सुद्धा म्हणत यांच्या कबरीवरील शिलालेख असून ते त्यांच्या काळातील अत्यंत शूरवीर व्यक्ती होते. त्यांचा मृत्यु फतेहाबाद म्हणजेच किल्ले धारूर येथे झाला होता. त्यांच्या मृत्यूची तारीख २९ जून १६३७ ही होती. शिलालेखाच्या ओळी 'अल्लाह अमर्त्य आहे ....' याने सुरुवात होणाऱ्या आहेत. एकाच चौथऱ्यावर असणाऱ्या कबरीपैकी त्यांची कबर उजव्या बाजूने चौथ्या क्रमांकाची आहे. त्यांचा मृत्यू गुरुवार १३ सफर हिजरी सन १०४७ ला म्हणजेच २९ जून १६३७ ला किल्ले फतेहाबाद म्हणजेच केज धारूर येथे झाला होता व हा किल्ला त्यांच्याच अखत्यारीत होता. शिलालेखाची लांबी १.१३ मीटर व रुंदी ४७ सेमी असून त्यामध्ये दहा ओळी दिसून येतात. हा शिलालेख पर्शियन भाषेत असून तो गद्य व पद्य स्वरुपात आहे.

मीर शरफुद्दीन हुसेन यांना मिळालेल्या हिंमत खान या पदविवरून ते शूरवीर असावेत. ऐतिहासिक दस्तऐवजावरून दोन भावांपैकी ते एक होते. मात्र त्यांची फारशी माहिती उपलब्ध होत नाही. असफ खानच्या सैन्यात ते एक महत्वाचे व विश्वासू अधिकारी होते. १६२७ मध्ये शहरयार युद्धात त्यांनी दाखवलेल्या अतुलनीय पराक्रमामुळे त्यांना हिंमत खान ही पदवी मिळाली होती. हे वर्ष शहाजहानचे राज्यारोहणाचे पहिले वर्ष होते.त्यांना मिळालेली ही पदवी १ शव्वाल हिजरी सन १०३७ म्हणजेच २५ मे १६२८ होती. तसेच त्यांच्या मृत्यूचे वर्ष हे शहाजहानच्या राज्यारोहणाचे दहावे वर्ष होते. शिलालेखामध्ये दिलेली माहिती या माहितीशी तंतोतंत जुळते व हा शिलालेख अचूक दिनांक व वर्ष सुद्धा स्पष्ट करतो.[7] शिलालेखातून हिंमत खानाविषयी आणखी महत्वाची माहिती ही मिळते की मृत्यूचे वेळी हिंमत खान धारूरच्या किल्ल्याचा किल्लेदार होता. ऐतिहासिक नोंदीप्रमाणे किल्ले धारूरवर असफ खानाने जानेवारी १६३१ ला विजय मिळवला होता. या शिलालेखानुसार त्या किल्ल्याचे किल्लेदारपद हिंमत खानाला देण्यात आले होते.

### ६. पंचगव्हाण येथी मीर मोहम्मद हुसेन नेकनाम यांच्या कबरीवरील शिलालेख -



नेकनाम साहिब दर्ग्याच्या परिसरातील चार थडग्यांच्या समूहाच्या चौथऱ्याला लागून उजवीकडे असणाऱ्या चौथऱ्यावर ही कबर असून त्यावर ८८ सेमी लांब व ४३ सेमी रुंद मापाचा शिलालेख आहे. या शिलालेखावर १२ ओळी अंकित असून त्या पर्शियन भाषेत गद्य व पद्य स्वरुपात अत्यंत लालित्यपूर्ण आहेत. शेवटची ओळ मात्र झिजलेली असून वर्ष दाखवणारे अंक अस्पष्ट व अवाचनीय झाले आहेत. त्यामुळे काळाचा अचूक अंदाज बांधता येत नाही. मात्र इतर ओळीवरून ही कबर मीर मोहम्मद युसुफ नेकनाम अल्वी अल हुसैनी यांचा पुत्र मीर मोहम्मद हुसेन नेकनाम यांची असल्याचे स्पष्ट होते.

त्यांचा मृत्यू शहाजहानचे काळात मुल्हेर किल्ल्याचा किल्लेदार व बागलाण प्रांताचा फौजदार असताना झाला होता. या शिलालेखामध्ये त्यांच्या नावासोबत नेकनाम या नावाचा वापर केलेला दिसून येतो जे उपाधी सोबतच त्यांचे आडनाव (कौटुंबिक नाम किंवा ओळख नाम) म्हणून प्रचलित झाले. या शिलालेखाचे बाबतीत सुध्दा हिरालाल यांनी काढलेला निष्कर्ष की त्यांचा मृत्यू त्यांचे वडिलांसोबतच युध्दामध्ये हिजरी सन १०२५ यज झाला होता, चुकीचे असल्याचे दिसून येते.

प्रारंभीच्या काळात मीर मोहम्मद हुसेन नेकनाम १००० फौज व १००० घोडेस्वारांचे सरदार होते. त्यांच्या भावाच्या हिंमत खानच्या निधनानंतर एक ते दीड महिन्याचे आतच त्यांची नियुक्ती जफरनगरच्या किल्ल्याचे किल्लेदार म्हणून करण्यात आली. त्यानंतरच्या वर्षी त्यांच्या अखत्यारीतील सैन्याची व घोड्यांची संख्या १५०० करून त्यांच्या श्रेणीत वाढ करण्यात आली होती. २४ डिसेंबर १६४६ ला त्यांची नियुक्ती बागलाण प्रांताचे सुभेदार म्हणून करण्यात आली होती.[8] मीर मोहम्मद हुसेन यांना सुध्दा त्यांच्या भावाप्रमाणे कर्तव्यावर असताना वीरमरण आले होते. त्यांचा मृतदेह पंचगव्हाण येथे वडील व भावाच्या कबरेशेजारी दफन करण्यात आला होता. शिलालेखातून त्यांच्या मरणाचे वर्ष अचूक समजत नसले तरी त्यांचा मृत्यू बागलाण मोहिमेवरून परत आल्यावर डिसेंबर १६४६ इध्ये झाला असावा.

**७. पंचगव्हाण येथील १६७३ चा शिलालेख -**



पंचगव्हाण येथील नेकनाम दर्ग्याच्या आग्नेय बाजूस असणाऱ्या थडग्याच्या डोक्याकडील भागाला असणाऱ्या कमानीवर हा शिलालेख अंकित आहे. मात्र ही कबर नेमकी कोणाची आहे याचा उलगडा या शिलालेखावरून होत

नाही. हिरालाल यांचे मते याच परिसरात आणखी एक कबर असून त्यावर कुणी आबिदा बीबी नावाच्या नेकनाम घराण्यातील महिलेचा मृत्यू झाल्याचे नमूद असून वर्ष मात्र अस्पष्ट आहे.मात्र तासाकोन्तही शिल्लेख अशा कोणत्याही कबरीवर त्या परिसरात आढळून आलेला नाही. जर असा एखादा शिलेख तेथे आहे / होता असे गृहीत धरले तरी आबिदा बीबी हे तिचे नाव नसून ती धर्मनिष्ठ महिलांसाठी वापरलेली पदवी आहे. या शिलालेखाचे बाबतीत मात्र एवढे निश्चित कि ही कबर नेकनाम घराण्यातील कुण्या व्यक्तीचीच असावी कारण ज्या धाटणीचे लेखन इतर कबरीवरील शिलालेखांवर आहे त्याच धाटणीचे व वळणाचे अक्षर अंकन या शिलालेखावर आहे. त्यामुळे या सर्व शिलालेखांचे लेखन करणारी व्यक्ती एकाच असावी व इतर सर्व शिलालेख ज्या अर्थी नेकनाम घराण्यातील व्यक्तींचे आहेत त्या अर्थी हा शिलालेख असणारी कबर सुध्दा नेकनाम घराण्यातील कुण्या व्यक्तीचीच असावी यात शंका नाही.

अंकित अक्षरांनी ३३ सेमी लांब व ३० सेमी रुंद एवढीच जागा व्यापली असून त्यावर दोन ओळी आहेत. सर्व शिलालेखांप्रमाणे या शिलालेखाची सुरुवात सुध्दा अल्लाहच्या अमर्त्यपणाची नोंद करणारी आहे. दुसरी ओळ ही पर्शियन भाषेतील असून तिचा अर्थ 'त्याला / तिला स्वर्गातील सर्वोच्च जागा देण्यात आली' या अर्थाची आहे. पर्शियन भाषेतील ल्कावितेच्या ओळींवरून ही कबर कदाचित हिजरी सन १०८४ म्हणजेच इसवी सन १६७३ – ७४ सालची असावी.[9]

**८. जहांदरशहाचे काळातील पंचगव्हाण येथिल शिलालेख –**



पंचगव्हाण येथील हा आठवा शिलालेख असून त्यावर मुगल सम्राट जहांदरशहाचे नाव अंकित आहे. हा शिलालेख बुलक बेग यांच्या थडग्यावर असून हे थडगे नेकनाम साहिब यांच्या दर्ग्याच्या दक्षिणेस आहे. हा शिलालेख सात ओळींचा असून तो पर्शियन भाषेत गद्य व पद्य मध्ये उत्कीर्ण केलेला आहे. यामध्ये नमूद आहे की शहाजहानाबाद म्हणजेच दिल्ली येथे राहणारे फौजदार बुलक बेग यांचे निधन जहांदरशहाच्या राज्यारोहणाच्या पहिल्याच वर्षाच्या ६ शाबानला (हिजरी सनाचा आठवा महिना ) झाला म्हणजेच २८ ऑगस्ट १७१२ ला त्याचा मृत्यू झाला होता.मात्र बुलक बेग फौजदार म्हणून कोठे नियुक होता याचा उलगडा या शिलालेखातून होत नाही. मात्र कदाचित तो पंचगव्हाणचा फौजदार असावा किंवा पंचगव्हाण त्याच्या फौजदारकी असलेल्या परगण्याच्या अखत्यारीत तरी येत असावे. कदाचित त्याचाकडे या परगण्याची जबाबदारी सुध्दा असावी. मामलेदार असणारा कुणी बुलकी बेग याने दहीहांडा येथे एक जमा मशीद बांधल्याचा उल्लेख अकोला जिल्हा गझेटियर मध्ये आढळतो. ह्या दोन्ही व्यक्ती कदाचित एकाच असाव्यात. हा शिलालेख चौरस आकारचा असून त्याचे माप ४४ सेमी आहे.[10]

**निष्कर्ष –** पंचगव्हाण हे स्थळ मुगल काळामध्ये एक महत्वाचे केंद्र होते. नेकनाम घराणे शेवटपर्यंत मुगल घराण्याशी एकनिष्ठ राहिले. वऱ्हाड व महाराष्ट्राच्या मध्ययुगीन मुगल इतिहासामध्ये या स्थळाचे व नेकनाम घराण्याचे मोठे योगदान राहिले आहे.

**टिपा -**

1 EI = एपिग्राफिया इंडिका

2 *For more information about monuments of Mugal period of Balapur read Marathi book of the writer of the paper, **‘Balapur Shaharatil Eitihasik Vastunch Abhyas’** Mother India Publication Amraoti.*

3 *To read more about these epigraphs please refer **‘Berar under the Mughals’** by Quddusi M.Y. and **‘Discriptive lists of inscriptions in CP & Berar’** by Hiralal.*

**संदर्भसाधने -**


1. *Deokar , op.cit., Page no 43.*
2. *EI, 1966 & 67, op.cit., Page no 44,45.*
3. *Ibid.*
4. *Ibid, Page no 45, 46.*
5. *Ibid, Page no 50.*
6. *Ibid, Page no 46 & 47.*
7. *Ibid page no 48 & 49.*
8. *Ibid page no 50, 51,52.*
9. *Ibid page no 52, 53.*
10. *Ibid page no 54.*